परिशिष्ट अ

विक्रीची अधिसुचना

नाशिक येथील जिल्हा व सत्र न्यायालय, नाशिक यांचे न्यायालयात.

संदर्भ:- जिल्हा व सत्र न्यायालय, नाशिक वित्त विभाग यांचेकडील मंजुर कार्यालयीन टिपणी दि.१७/०१/२०२४ अन्वये.

याद्वारे नोटिस देण्यात येत आहे की, वर उल्लेखिलेल्या संदर्भांकित कार्यालयीन टिपणी नुसार या अधिसूचने सोबत जोडलेल्या अनुसूचीत नमूद केलेली जिल्हा व सत्र न्यायालय,नाशिक कार्यालयाकडील निरूपयोगी, दुरूस्त न होण्याजोगे शासकीय वाहने लिलाव प्रक्रियेव्दारे विकण्याविषयी वरिल संदर्भान्वये परवानगी दिलेली आहे.

सदर जाहिर लिलावा दरम्यान कोणताही तहकूबीचा आदेश न आल्यास सदरहु लिलावाने विक्रीचे काम सदरची निरूपयोगी शासकीय वाहने ज्या ठिकाणी ठेवलेली आहे त्या ठिकाणी म्हणजेच न्यायाधीश कॉलनी त्रंबकरोड, हॉटेल सिबल समोर त्रंबकरोड नाशिक येथील न्यायाधीश कॉलनीचे आवारात दिनांक ०५/०४/२०२४ रोजी सकाळी ठिक ११ वाजता लिलावाची प्रक्रिया सुरू करण्यात येईल.

सदर लिलावाचे वेळी सदर लिलावात स्वारस्य असणा-या सर्व लोकांना जातीने किंवा येथोचितरित्या प्राधिकृत केलेल्या एजंटामार्फत हजर रहाता येईल व लिलावाची प्रकीया सुरु होण्याअगोदर **दि.३०/०३/२०२४ सायं. ५.०० वाजेपावेतो** सर्व लिलावात भाग घेणा-यांनी त्याबाबतचा **लेखी अर्ज अधिक्षक वित्तविभाग जिल्हा व सत्र न्यायालय,नाशिक** यांचेकडेस सोबत जोडलेल्या विहित नमुन्यात सादर करावा वरील मुदतीनंतर आलेले अर्ज सदर लिलाव प्रक्रियेबाबत विचारात घेतले जाणार नाही याची सर्वांनी नोंद घ्यावी.

लिलाव विक्रिच्या इतर शर्ती खालीलप्रमाणे आहेत:-

१. लिलावातील बोली कोणत्या रक्कमेने वाढवयाची ते विक्रीचे काम चालविणा-या अधिका-याकडून ठरविण्यात येईल. लिलाव किती रक्कमेस मागितला किंवा कोणी मागितला याबाबत कोणताही वाद उपस्थित झाल्यास त्या बाबतचा निर्णय संबंधित लिलाव कर्त्याच्या अधिकारात घेण्यात येईल.

२. जो कोणी सदर लिलावामध्ये सर्वात जास्त किंमत देवू करील त्याला त्या लिलावाचा खरेदीदार ठरविण्यात येईल, परंतु तो बोलीदार लिलाव मागण्यास कायदेशीररित्या सक्षम असला पाहिजे.

३. बोलीत देवू केलेली किंमत जेव्हा कमी असल्याचे दिसून येईल त्यावेळी लिलावाचे काम चालविणारे अधिकारी हे त्यांच्या स्वेच्छा निर्णयानुसार ती बोली नाकारु शकतील.

४. लिलावाने विक्रीचे काम करणारे अधिकारी यांना कोणत्याही कारणास्तव आवश्यकता भासल्यास ते लिलाव स्थगित करण्याची कारणे नमूद करुन विक्रीचे काम स्थगित करु शकतात.

५. लिलावाची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर लिलावाची रक्कम लिलाव घेणा-या व्यक्तीने त्वरित भरावी व लिलावाची संपुर्ण रक्कम भरल्यानंतरच लिलावातील वस्तु सबंधितास ताब्यात देण्यात येईल. तसेच लिलाव केलेली मालमत्ता स्वखर्चाने लिलाव घेणा-या व्यक्तीला ७ दिवसांचे आंत लिलावाच्या जागेवरुन न्यावी लागेल अन्यथा योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

६. लिलाव प्रक्रियेमध्ये भाग घेण्याबाबतच्या अर्जासोबत अर्जदाराने आधारकार्ड/पॅनकार्ड तसेच सध्या राहत असलेल्या निवासस्थानाचा पत्त्याचा पुरावा यांची स्वः साक्षांकित झेरॉक्स प्रत तसेच २ पासपोर्ट साईज रंगीत फोटो सादर करावे लागेल.

आमच्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

दिनांक १६/०३/२०२४.

DISTRICT COURT OF NASHIK
जिल्हा न्यायालय, नाशिक
सत्यमेव जयते

जिल्हा न्यायाधीश -४ व अति.सत्र न्यायाधीश,
नाशिक

**मार्फतः- मा. दिवाणी न्यायालय व. स्तर, नाशिक**
**प्रत नोटिस बोर्डवर डकविण्यासाठी**

१. मा. जिल्हाधिकारी सो, जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक.
२. मा. आयुक्त सो, नाशिक महानगरपालिका, नाशिक.
३. जिल्हा न्यायालय,नाशिक यांचे नोटिस बोर्डवर
४. उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, नाशिक.

## लिलाव करावयाच्या वस्तु/मालमत्तेची अनुसूची

| अ. क्र. | वस्तुंचे/मालमत्तेचे वर्णन | वाहन नोंदणीचा दिनांक | उपप्रादेशिक परिवहन अधिकारी यांनी ठरविलेली सरकारी किंमत |
|---|---|---|---|
| १ | एम.एच.१५ अेअे २२२ हुंदाई असेंट कार पेट्रोल पांढ-या रंगाची | ०४/०४/२०१० | मा. उप प्रादेशिक परिवहन अधिकारी यांनी ठरविलेली किंमत रुपये ४०००० मात्र |
| २ | एम.एच.०१ एस.ए. २२२ मारुती बलेनो कार पेट्रोल पांढ-या रंगाची | २१/०३/२००५ | मा. उप प्रादेशिक परिवहन अधिकारी यांनी ठरविलेली किंमत रुपये ३०००० मात्र |
| ३ | एम.एच.०१ एस.ए. १०१ मारुती बलेनो कार पेट्रोल पांढ-या रंगाची | २१/०३/२००५ | मा. उप प्रादेशिक परिवहन अधिकारी यांनी ठरविलेली किंमत रुपये ४५००० मात्र |

दिनांक १६/०३/२०२४.

DISTRICT COURT OF NASHIK ★ जिल्हा न्यायालय, नाशिक ★ सत्यमेव जयते

जिल्हा न्यायाधीश -४ व अति.सत्र न्यायाधीश,
नाशिक.